ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख ११ मे, १९५४ | अंक १८

## विविध माहिती

**भारतीय रेडिओसाठी परदेशी बाजारपेठा**—भारतामध्यें जुळविलेले रेडिओ सेट्स परदेशीं खपण्याची शक्यता अजमावण्याच्या सूचना मध्यवर्ती सरकारनें आपल्या परदेशस्थ व्यापारी प्रतिनिधींना दिल्या आहेत. युद्ध संपल्यानंतरच्या नजीकच्या कालांत अतिपूर्वेकडील देशांतून अशा बाजारपेठा उपलब्ध झाल्या होत्या. पण खुद्द भारतांतच रेडिओंची चणचण भासूं लागल्यामुळें त्यांच्या निर्यातीवर मर्यादा घालण्यांत आल्या होत्या. आतां त्या रद्द झाल्या आहेत.

**सरकारी मालकीचा कांच-कारखाना**—शास्त्रीय उपकरणें आणि नेत्रविज्ञान ह्यांना लागणारीं भिंगें तयार करण्याचा एक कारखाना उभारण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे. ह्या कारखान्याची उत्पादनक्षमता १० टनांची राहील.

**इराकला भारताची मदत**—तैग्रीस नदीला आलेल्या पुरांत हजारों इराकी नागरिकांची वाताहत झाली. ह्या लोकांना मदत करण्यासाठी भारतीय सरकारनें इराकी सरकारला २,००० पौंड रोख रक्कम आणि ५,००० पौंड चहा मदतीदाखल दिला आहे. त्याशिवाय इराकमधील हिंदी नागरिकांनीं वर्गणी करून १,००० पौंड दिले.

**भारताचा द्विखंडात्मक इतिहास**—अमेरिकेंतील मार्टिन प्रेसनें "भारताचे माजी राज्यकर्ते" ह्या शीर्षकाखाली भारताचा द्विखंडात्मक इतिहास प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकी पहिला खंड नुकताच प्रसिद्ध झाला आहे ह्या खंडांत १६०० पासून १८५७ पर्यंतचा इतिहास आला आहे भारताच्या सिव्हिल सर्व्हिसमधील निवृत्त अधिकारी मि. फिलप मेसन हे ग्रंथाचे कर्ते आहेत. त्यांनीं १९२८ ते १९४७ पर्यंत भारतीय सरकारची नोकरी केली होती.

**भारतीय एंजिनिअर्सचा अभ्यास**—चीनमधील दोन धरणांच्या योजनांचा अभ्यास करण्यासाठी तीन भारतीय एंजिनिअर्स नुकतेच चीनला रवाना झाले. कोसी धरणावर देखरेख करणारे मुख्य एंजिनिअरहि लवकर चीनला रवाना होणार आहेत. त्याशिवाय आणखी तीन भारतीय एंजिनिअर्स जपानला जाणार आहेत.

**ग्रँड एक्सप्रेसला तिसऱ्या वर्गाचे अधिक डबे**—मद्रास ते दिल्ली हा प्रवास करणाऱ्या ग्रँड ट्रंक एक्सप्रेसला तिसऱ्या वर्गाचे अधिक डबे जोडण्याचें रेल्वे बोर्डानें ठरविलें आहे. सध्या आठवड्यांतून तीन दिवस दुसऱ्या वर्गाचा एक जादा डबा जोडण्यांत येतो. त्याऐवजीं आता तिसऱ्या वर्गाचा एक डबा जोडण्यांत येणार आहे.

**इजिप्तमध्यें पोलादाचा कारखाना**—कैरोपासून २० मैलांवर असलेल्या हेलवान ह्या ठिकाणीं पोलादाचा कारखाना काढण्याचें ईजिप्तच्या सरकारनें ठरविलें आहे. जर्मनीमधील डुइसबर्ग येथील डिमॅग ह्या कंपनीनें कारखाना काढण्याच्या कामीं साह्य देण्याचें कबूल केलें आहे. पहिलीं दोन वर्षे दरवर्षी १,२५,००० टन पोलादाचें उत्पादन करण्यांत येईल. नंतर तें ५,००,००० टनांपर्यंत वाढविण्यांत येईल.

**ब्रिटन-रशिआ व्यापार**—रशिआनें ब्रिटिश कारखानदारांकडे ३ ते ४ कोटी पौंड किंमतीच्या मालाच्या मागण्या नोंदविल्या आहेत तथापि, उभय राष्ट्रांत युद्धोत्तर कालीं झालेल्या व्यापारापेक्षा १० पट अधिक व्यापार होण्याची शक्यता आहे. असें रशिअन-ब्रिटिश चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष सर ग्रेनव्हिल मॅगिनेस ह्यांनीं सांगितलें. व्यापार वाढविण्याची रशिआची खरीखुरी इच्छा आहे, असेंहि ते म्हणाले.

**ब्रह्मदेशांतील पोलादाचा कारखाना**—पश्चिम जर्मनीमधील आयर्न अँड स्टील कॉर्पोरेशन ही कंपनी क्रुप्स कंपनीच्या साह्यानें भारतामधील ओरिसा राज्यांतील पोलादाचा कारखाना बांधीत आहे. ह्याच कॉर्पोरेशननें ब्रह्मदेशांतील पहिला पोलादाचा कारखाना बांधण्याचा करार केला आहे. कारखाना रंगून जवळ निघणार असून ब्रम्ही तंत्रज्ञांना शिक्षणहि देण्यांत येणार आहे.

**टागोरांची समाधि बांधणार**—भारताचे प्रसिद्ध साहित्यिक रवींद्रनाथ टागोर १३ वर्षांपूर्वी दिवंगत झाले. त्यावेळीं त्यांचा पार्थिव देह निमतोळ घाटावर दहन करण्यांत आला. त्या ठिकाणीं त्यांची समाधी बांधण्याचें अ. बंगाल रवींद्र साहित्य संमेलन ह्या संस्थेनें ठरविलें आहे.

**भारतासाठी कॉमेट विमानें**—एअर इंडिआ इंटर-नॅशनल ह्या कंपनीनें कॉमेट जातीचीं दोन विमानें घेण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी मागणी नोंदण्यांत आली असली तरी सदर विमानें वहातुकीला योग्य आहेत ह्याविषयीं कारखानदारांची खात्री झाल्याशिवाय मात्र ती घेण्यांत येणार नाहीत. विमानें तयार करणाऱ्या कारखान्यानें त्यांच्यासंबंधी शिक्षण देणारा एक वर्ग उघडला होता, त्यात सहा भारतीयांनीं शिक्षण घेतलें.

**रशिआची मांसाची खरेदी**—रशिआनें द. आफ्रिकेकडून ६,००० ते ७,००० टन गोठलेले मांस विकत घेतलें आहे. हें मांस घेऊन जाणारी बोट नॉर्वेजिअन असून तींत तळमजल्यावर गोठलेले मांस सडूं नये, ह्याची खास सोय करण्यांत आली आहे. द. आफ्रिकेकडून गोठलेले मांस घेण्याचा रशिआचा हा पहिलाच प्रसंग आहे.

## नवे साखर कारखाने सहकारी तत्त्वावरच काढले पाहिजेत

"नव्या साखर कारखान्यांच्या स्थापनेस भारत सरकार परवाने देण्याचा विचार करीत आहे, असें समजतें. महाराष्ट्रांत आणि त्यांतहि कोल्हापूर जिल्ह्यांत उंसाच्या सलग लागवडींची बरींच मोठीं क्षेत्रें आहेत. उंसाच्या उत्पादकांची सहकारी संघटना करून साखरेची निर्मिति सहकारी तत्त्वावर करण्याचा प्रश्न मुंबई राज्यांत तरी महत्त्वाचा आहे. लोणी येथील सहकारी साखर कारखाना समाधानकारक चालू आहे आणि गोदावरी कालव्यावरहि एक सहकारी साखर कारखाना नोंदविण्यांत आला आहे. अशाच इतर योजना मुंबई राज्य सरकारच्या पुढें आहेत, असें कळतें. ह्यापुढें स्थापन व्हावयाचे कारखाने सहकारी सोसायट्यांच्या मालकीचे असावेत व त्यांनींच ते चालवावेत, आणि त्यांस राज्य सरकारनें परवाने व इतर मदत द्यावी, अशी प्लॅनिंग कमिशनची शिफारस आहे. खाजगी मालकीच्या कारखान्यांतून कामगारांचा प्रश्न बराच बिकट झाला आहे. शेतकरी व कारखानदार ह्यांचेमध्यें उत्तर प्रदेशांत तंटे होतात, तर महाराष्ट्रांत कारखानदार व त्यांना दीर्घ मुदतीच्या खंडानें जमीन देणारे परंतु आतां मजूर बनलेले शेतकरी ह्यांच्यांत कटुता निर्माण होते. ऊंस पिकविणारांनाच सहकारी तत्त्वावर साखर कारखाने काढण्यास उत्तेजन दिलें, तर हे तंटे टळूं शकतील. मुंबई राज्यांत प्रवरा लेफ्ट बँक कॅनाल, निरा कॅनाल व कोल्हापूर येथें असे प्रयत्न चालू आहेत. त्यांस सरकारनें पूर्वीप्रमाणेंच सक्रिय मदत केली पाहिजे. ह्या राज्यांत नवे साखर कारखाने स्थापताना सहकारी उपक्रमांसच फक्त परवाने देण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें पाहिजे, आणि किमानपक्षी कोणत्याहि व्यक्तीस किंवा लिमिटेड कंपनीस नवा परवाना देऊं नये, असें " मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटचे ऑनररी सेक्रेटरी, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांनीं पत्रक काढलें आहे ."

[ नव्या साखर कारखान्यांच्या स्थापनेसाठी, चालू कारखान्यांच्या वाढीसाठी व स्पिरिट उत्पादनासाठी परवान्यांकरितां भारत सरकारनें अर्ज मागविले होते, त्यांची मुदत १ मे रोजीं संपली. ती आतां ३१ मे अखेर वाढविण्यांत आली आहे. —संपादक ]

---

## " आधीं केलें, मग सांगितलें "

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

" राष्ट्रीय नियोजन कर्ज " उभारणीसाठी पहिल्याच आठवड्यांत महाराष्ट्र बँकेनें रु. दहा लाखांचे कर्जरोखे घेऊन हातभार लावला, पण त्याशिवाय रु. तीन लाखांचे रोखे या बँकेतर्फे खरेदी करण्यांत आले. कर्जरोखे घेण्यास सर्व रकम आजच हाताशीं नसणाऱ्यांचेसाठीहि बँकेनें विशेष सवलतीची योजना काढली असून तिचा फायदा बँकेच्या खातेदारांना घेतां येईल.


---

### रशिअन विमानें अमेरिकन वैमानिकांनीं चालविलीं


जिनीव्हा येथें २६ तारखेस सुरू होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेस आलेल्या रशिअन प्रतिनिधींनीं आपल्याला लागणारें कांचसामान आणि डबाबंद अन्न रशिआंतूनच आणलें आहे. एका विमानांतन सामान आलें व दुसऱ्यांतून प्रतिनिधी आले. मात्र हीं दोन्हीं विमानें पूर्व जर्मनींतून जिनीव्हापर्यंत अमेरिकन वैमानिकांनीं चालविलीं. कारण, विमानांचा प्रवास अमेरिकनव्याप्त जर्मन प्रदेशावरून होणार होता.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर



हातपंप
उन्हाळी पिकासाठी व घरगुती पाणीपुरवठ्यासाठी खात्रीची उपाययोजना.
विशेष माहितीसाठी लिहा.



सेंट्रिफ्युगल पंप
किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी द. सातारा

फोन नं. ३२१५ तार—SANCOSOP
पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.
१२५ भवानी पेठ, पुणें २.
* शेतीचीं अवजारें, एंजिन्स, त्यांचीं तेलें यांचे विक्रेते.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत वगैरे सर्व प्रकारचीं खतें पुरवणारी प्रमुख संस्था.
* गूळ, ज्वारी, बाजरी, वगैरे शेतमालाची विक्री करणें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा-बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत पुरवणारी एकमेव संस्था.
* बटाटा, कांदा, लसूण या मालाची अल्प कमिशनवर विक्री करून देणारी संस्था.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका तयार करून माफक दरानें पुरवल्या जातात.
वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.
ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ११ मे, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांचा अप्रमाण व्यवस्थाखर्च

### ट्रायब्यूनलच्या निवाड्यामुळें त्यांत आणखी वाढ

हिंदी बँकांचा नोकरवर्गाच्या पगाराचा खर्च कसा वाढत चालला आहे, ह्याचें वर्णन युनायटेड कमर्शिअल बँक लि. चे चेअरमन, श्री. जी. डी. बिर्ला, ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं केलें. ह्या खर्चाचें ठेवींशीं प्रमाण, हिंदी शेड्यूल्ड बँकांचे बाबतींत, १९४८ मध्यें १·०९% होतें तें १९५२ मध्यें १·८०% झालें. म्हणजे, सुमारें ७०% वाढ झाली. अमेरिकेंतील तत्सम प्रमाण ¾ ते १% कायम राहिलेलें आहे. अमेरिकेच्या मानानें भारतांत ह्या खर्चाचा बोजा ११५% ज्यास्त आहे. ह्यामुळें एकूण व्यवस्थाखर्चाचा ठेवींवरील बोजा २·३५% पर्यंत जड झालेला आहे. ठोक नफ्यांत पगाराच्या खर्चाचें प्रमाण १९४८ मध्यें ४४·३१% होतें तें १९५२ मध्यें ५०·८६% झालें; अमेरिकन बँकांच्या बाबतींत तें ३१% आहे. एकूण व्यवस्थाखर्च हिशेबांत घेतला, तर ठोक नफ्याशीं त्याचें प्रमाण ६६·७% पडतें; अमेरिकेंत तें ५३·७ आहे. ह्याचा अर्थ, भारतांतील बँकांच्या ठोक नफ्यापैकीं दोनतृतीयांश नफा व्यवस्थाखर्च खाऊन टाकतो आणि बाकीच्या एकतृतीयांशांतून नोकरवर्गास बोनस, कर्जरोख्यांच्या किंमतींतील घसारा, बुडीत कर्जें, इत्यादींची तरतूद करावी लागते व उरलेल्यांतून कर देऊन डिव्हिडंड वाटण्याची व रिझर्व्ह काढण्याची व्यवस्था करावी लागते. प्रत्येक बँककचेरीचा सरासरी व्यवस्थाखर्च १९४८ मध्यें ३३,००० रु. होता तो १९५२ मध्यें ५०,००० रु. झाला. बँकांकडील ठेवींत घट होत असतांना ही वाढ झालेली आहे. इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स अ‍ॅक्टामुळें बँकांना तोट्यांत चालणाऱ्याहि कचेऱ्या बंद करणें अवघड जातें, कामचुकार नोकराला काढणें अशक्य होतें, इतकेंच नव्हे तर पगारांत वाढ देत रहावें लागतें; बँकेला मग तें परवडो किंवा न परवडो.

### लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा

लेबर अपेलेट ट्रायब्यूनलच्या निवाड्याप्रमाणें नोकरपगाराचा बँकांवरील बोजा आणखी ८ ते १२% नें वाढेल, असा अंदाज आहे. त्यामुळें बँकांच्या उत्पन्नावर अनिष्ट परिणाम होण्याची भीति आहे. ज्या बँकांचें शाखांचें जाळें फार मोठें आहे, अशांना हा निवाडा अधिक जाणवेल, हें उघड आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखा बँक ऑफ इंडियाच्या मानानें पुष्कळच जास्त आहेत. बँकांना त्यांचे चार्जेस वाढवावे लागतील किंवा नोकरवर्गांत कपात करावी लागेल, असें बँकर्स म्हणतात. निदान बँकांच्या सोईची वाढ आतां आखडती घ्यावी लागेल, हें निश्चित. नव्या अवार्डप्रमाणें मोठ्या शहरांत नोकरांचा प्रारंभींचा पगार ८५ रु. होईल; सेन निवाड्याप्रमाणें तो ९६ रु. होता. परंतु महागाई भत्ता इतका वाढविण्यांत आला आहे कीं, एकूण मिळकत सेन अवार्डपेक्षा ज्यास्त भरते. सेन निवाड्यांत महागाई भत्ता ठिकठिकाणच्या रहाणीच्या खर्चाच्या इंडेक्सशीं निगडित केलेला होता. आतां मोठ्या शहरांतील महागाई भत्ता वाढल्यानें एकूण मिळकत १४३ रु. होईल. पूर्वी ती मुंबईत १२९ रु. ८ आ., अहमदाबादमध्यें ११० रु. ८ आ., कलकत्त्यांत १२१ रु. व मद्रासमध्यें १२६ रु. होती.

अ, ब आणि क वर्गाच्या बँकांतील वेतनश्रेणी ट्रायब्यूनलनें वाढविली आहे व महागाई भत्त्यांतहि बरीच वाढ केली आहे. ड वर्गातील बँकांवर मात्र त्यानें कृपा दाखविली आहे. ह्या बँका आकारानें लहान, कमी आर्थिक ताकदीच्या व आंतर-राज्य व्यवहार नसणाऱ्या असल्यानें, शास्त्री निवाड्याच्या अटींचें पलीकडे ट्रायब्यून गेलेलें नाहीं. ३१ मार्च, १९५९ पर्यंतच ही सवलत त्यांना मिळेल; त्यानंतर त्यांना क वर्गातील बँकांना लागूं असलेले नियम पाळावे लागतील. बँकांचें वर्गीकरण शास्त्री-निवाड्यांतीलच कायम ठेवलेलें आहे.

प्रत्येक बँकेच्या नोकरवर्गाच्या बोनसाचा प्रश्न स्वतंत्रपणें सोडवावा, हा ट्रायब्यूनलचा निर्णय नवी प्रथा सुरू करणारा आहे आणि नोकरवर्गाला तो समाधान देणार नाहीं. बँकांचे गुप्त रिझर्व्ह त्यांना प्रकट करायला लावणारा ट्रायब्यूनलचा आग्रहहि सयुक्तिक नाहीं. नोकरांचे संघ मान्य करून, तंटे सोडविण्याच्या सूचना शास्त्री निवाड्यानें केल्या होत्या, त्या नव्या निवाड्यानें रद्द केल्या आहेत. बँका आणि त्यांचे नोकर ह्या दोघांनाहि आपला निवाडा समाधानकारक वाटेल, असा ट्रायब्यूनलचा विश्वास आहे. बँकांच्या वाढीशीं आर्थिक प्रगतीचा निकटचा संबंध असल्यानें, प्रस्तुत निवाड्यामुळें बँकांच्या अखंड प्रगतीस वाव मिळाला, तर तें योग्यच होईल.

बँकांच्या नोकर-पगाराच्या खर्चाचा विचार करतांना एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, कित्येक बँकांतील वरिष्ठ नोकरांना हजारों रुपये दरमहा पगार मिळतो; त्यांत वार्षिक वाढहि मोठ्या प्रमाणावर होत जाते; परंतु कनिष्ठ वर्गाच्या पगाराचा प्रश्न आला कीं, बँकिंगच्या भवितव्यावर त्याच्या होणाऱ्या परिणामाचा बागुलबोवा पुढें केला जातो, अशी नोकरवर्गाची तक्रार आहे. नोकरांना दिला जाणारा पगार बँकेला परवडला पाहिजे, तसाच तो नोकरांना पुरलाहि पाहिजे, हें उघड आहे. ह्या दृष्टीनेंहि पगारखर्चाकडे पाहिले पाहिजे. बँकांच्या एकूण ठेवींशीं किंवा ठोक नफ्याशीं त्याचें प्रमाण कमी पाडण्याचा पगारावर नियंत्रण ठेवणें हा एकच मार्ग नाहीं, हें बँकांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

**शस्त्रक्रिया व टेलिव्हिजन**—न्यूयॉर्क येथील सेंटव्हिन्सेंट ह्या इस्पितळांत शस्त्रक्रिया करण्याच्या तीन खास खोल्या बांधण्यांत आल्या आहेत. शस्त्रक्रिया चालू असतां तिचें सर्व दृश्य रंगीत टेलिव्हिजनच्या साह्यानें आणि आवाजाच्या साह्यानें प्रक्षेपित करण्याची व्यवस्था ह्या खोल्यांतून करण्यांत आली आहे. अशा प्रकारची व्यवस्था करणारें अमेरिकेंतील हें पांचवें इस्पितळ आहे.

## भारतीय व अमेरिकन बँकांच्या नोकरांचा पगार खर्च व एकूण व्यवस्था खर्च

| | १९४८ | १९४९ | १९५० | १९५१ | १९५२ |
|---|---|---|---|---|---|
| **हिंदी शेड्यूल्ड बँका** | | | | | |
| ठेवी ( कोटी रु. ) ... ... | ८७५ | ८६० | ७५४ | ७४८ | ७१५ |
| ठोक नफा ( कोटी रु. ) ... ... | २१·४४ | २१·४७ | २२·१४ | २४·६२ | २५·२५ |
| निव्वळ नफा ( कोटी रु. ) ... ... | ८·०७ | ७·८८ | ६·५८ | ७·५१ | ७·४४ |
| नोकरपगाराचें ठोक नफ्याशीं प्रमाण % ... | ४४·३१ | ४८·८ | ५०·८० | ४८·६८ | ५०·८६ |
| „ „ ठेवींशीं प्रमाण % ... | १·०९ | १·२६ | १·४९ | १·६० | १·८० |
| व्यवस्थाखर्चाचें ठोक नफ्याशीं प्रमाण % ... | ६०·६ | ६३·७ | ६५·७ | ६४·८ | ६६.७ |
| „ „ ठेवींशीं प्रमाण ... ... | १·४८ | १·८० | १·९३ | २·१३ | २·३५ |
| प्रत्येक बँक कचेरीचा सरासरी व्यवस्थाखर्च (हजार रु.) | ३३ | ३७ | ४२ | ४६ | ५० |
| **अमेरिकन फे. रि. समासद–बँका** | | | | | |
| ठेवी ( अब्ज डॉलर ) ... ... | १२१ | १२३ | १३३ | १४१ | १४७ |
| ठोक नफा ( अब्ज डॉलर ) ... ... | २·५ | २·७ | २·९ | ३·४ | ३·८ |
| नोकर पगाराचें ठोक नफ्याशीं प्रमाण % ... | ३४ | ३४ | ३३ | ३३ | ३१ |
| „ „ ठेवींशीं प्रमाण % ... ... | ·७२ | ·७५ | ·७५ | ·८० | ·८४ |
| व्यवस्थाखर्चाचें ठोक नफ्याशीं प्रमाण % ... | ५६·४ | ५६·२ | ५४·८ | ५३·९ | ५३·८ |
| „ „ ठेवींशीं प्रमाण % ... | १·२० | १·२४ | १·२३ | १·२८ | १·३७ |

टीप : १ ठोक नफा म्हणजे बँकिंगच्या व्यवसायांतील नफ्यांतून दिलेलें व्याज वजा करून होणारी रक्कम.
२ व्यवस्थाखर्चात नोकरपगाराचा व इतर खर्चांचा समावेश होतो, पण दिलेल्या व्याजाचा नाहीं.

### कोसीवरील धरणाचा करार

कोसी नदीवरील धरणासंबंधीं नेपाळ आणि भारत ह्यांच्या दरम्यान करार करण्यांत आला असून धरणाच्या प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात होईल असें समजतें. ह्या योजनेसंबंधीं प्रथमपासूनच म्हणजे १९४६ सालापासूनच बराच वादविवाद चालू झाला. आतां झालेला करार होण्यापूर्वींसुद्धां अगदीं अखेरच्या घटकेपर्यंत कमीअधिक उत्तेजनकारक बातम्या प्रसिद्ध होतच होत्या. धरणाच्या बांधकामाची जागा अगर गाळाची विल्हेवाट ह्यासंबंधीं नेपाळचें पूर्णपणें समाधान झालेलें नव्हतें. कोसी नदीच्या बेलगाम पुरामुळें बिहारला फार नुकसान सोसावें लागतें. तें नुकसान टाळण्याच्या दृष्टीनेंच मुख्यतः धरणाची योजना आखण्यांत आलेली आहे. तथापि, नेपाळलाहि धरणापासून फायदा होण्यासारखा आहेच. धरण बांधूं देण्याबद्दल नेपाळला रॉयल्टी मिळणार आहे. धरणाच्या जागीं उत्पन्न होणाऱ्या विजेपैकीं निम्मी म्हणजे सुमारें १०,००० किलोवॅट वीज नेपाळला वापरतां येईल. त्याशिवाय धरणापासून डाव्या बाजूस काढण्यांत येणाऱ्या कालव्यामुळें १,२०,००० एकर जमिनीला आणि उजव्या बाजूस काढण्यांत येणाऱ्या कालव्यामुळें २,५०,००० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होणार आहे. धरणामुळें ज्या नेपाळी नागरिकांना जमिनीला मुकावें लागेल त्यांची पुनर्वसाहत भारत सरकार आपल्या खर्चानें करून देणार आहे. नेपाळमधील इतर नद्यांवर वीज निर्माण करणाच्या योजनांना भारतीय इंजिनीअर्सचें सहकार्य मिळणार आहे. संकल्पित धरण वराहक्षेत्र ह्या ठिकाणीं बांधण्यांत येणार होतें. पण आतां त्याची जागा बदलली आहे. नव्या योजनेमुळें पुराचें नियंत्रण करणें अधिक सोपें होईल, शेतीला पाणी मिळेल आणि उत्पन्न होणाऱ्या विजेचा खपहि सुलभ होईल अशा रीतीनें ती आखण्यांत आली आहे. हें धरण बांधण्याच्या अनुभवामुळें पुढेंमागें नवें मोठें धरण बांधण्याची योजना अधिक सुलभ होईल.

### भारतामधील तागाचा धंदा

भारताचे डायरेक्टर जनरल ऑफ स्टॅटिस्टिक्स् ह्यांनीं देशांतील तागाच्या धंद्याची आंकडेवार माहिती प्रसिद्ध केली आहे. देशांत तागाच्या १०५ गिरण्या आहेत. सर्व गिरण्यांत मिळून ७७·७७ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे. त्यापैकीं २८·५७ कोटी रुपये भांडवल कायम स्वरूपाचें असून ४९·२ कोटी रुपयांचें खेळतें भांडवल आहे. प्रत्यक्ष गिरण्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्या २,७१,६६२ असून धंद्याशीं अप्रत्यक्षरीत्या संबंध असणाऱ्या कामगारांची संख्या १५,३९३ आहे. पहिल्या प्रकारच्या कामगारांना वेतनाच्या रूपानें २२·३ कोटी रुपये मिळतात आणि दुसऱ्या प्रकारच्या कामगारांना ३·११ कोटी रुपये मिळतात. हे सर्व आकडे १९५१ सालाचे आहेत. त्या वर्षी ८,८९,४११ टन तागाचें उत्पादन झालें, आणि त्याची किंमत २१२·४२ कोटी रुपये झाली. धंद्यांत वापराव्या लागणाऱ्या कच्च्या मालाची किंमत १५४·८१ कोटी रुपये झाली. कच्चा तागच ९,३७,४४६ टन वापरावा लागला. त्याची किंमत १४६·५ कोटी रुपये झाली. तागाच्या लागवडीला आसाममधील हवामान फार अनुकूल आहे. कारण, ह्या राज्यांत मधून मधून पावसाच्या सरी पडतात आणि दरम्यान कडक उष्णताहि असते. प. बंगालमध्येंहि तागाची लागवड होते. पण यंदा पावसाची अनिश्चिती भासत असल्यामुळें तागाची लागवड अडून राहिलेली आहे. चालू सालीं आसाममध्यें, कमी उंचीवर असलेल्या प्रदेशांत तागाची लागवड पूर्ण झालेली आहे. मध्यम उंचीच्या प्रदेशावर लागवडीचें काम पूर्ण होत आलें आहे. पाकिस्तानी बंगालमध्यें हवामान उष्ण आणि कोरडें आहे. त्यामुळें तागाच्या पिकाची चांगली परिस्थिति आहे. गेल्या वर्षीपेक्षा लागवडहि लवकर पुरी होईल असें दिसतें. तथापि पाकिस्तानी बंगालच्या कांहीं भागांत सुद्धां अजून पुरेसा पाऊस पडणें आवश्यक आहे.

## औद्योगिक विकासासाठी पैशाची तरतूद

### मुंबई राज्य फायनान्शियल कॉर्पोरेशनच्या कामास प्रारंभ

मुंबई राज्य फायनान्शिअल कॉर्पोरेशनच्या कामास सुरुवात झाली असून या कॉर्पोरेशनमार्फत राज्यांतील मध्यम आणि छोट्या उद्योगधंद्यांच्या गरजा भागविण्यांत येतील.

१९५१ च्या स्टेट फायनान्शिअल कॉर्पोरेशन्स कायद्यानुसार हें कॉर्पोरेशन स्थापन झालें असून राज्यांतील औद्योगिक विकासासाठी पैशाची तरतूद करणें हा त्याचा मुख्य हेतु आहे. तेव्हां राज्यांतील मध्यम आणि छोट्या उद्योगधंद्यांना भांडवल म्हणून आणि उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी किंवा त्यांत आधुनिक स्वरूपाच्या सुधारणा करण्यासाठी जमीन, इमारती, यंत्रसामुग्री वगैरे उत्पादनाचीं साधनें खरेदी करण्यासाठी पैसा पुरविणें हें या कॉर्पोरेशनचें कार्य आहे. कॉर्पोरेशनच्या कामकाजासाठी ज्या उद्योगधंद्यांचें गुंतविलेलें भांडवल ५ लाख रुपयांपर्यंत असेल असे उद्योगधंदे हे छोटे उद्योगधंदे व ज्या उद्योगधंद्यांचें शेअर भांडवल अथवा मालमत्ता २० लाख रुपयांचें असेल असे उद्योगधंदे हे मध्यम स्वरूपाचे उद्योगधंदे ठरविण्यांत आले आहेत.

### कोणत्या उद्योगधंद्यांना मदत मिळूं शकेल ?

वस्तू तयार करणारे, वस्तू टिकविणारे अथवा त्यावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे, खाणीबाबतचे उद्योगधंदे अथवा वीज किंवा दुसरी कोणतीहि यंत्रशक्ति निर्माण करणारे व तिचें वाटप करणारे उद्योगधंदे हे सदरहू कायद्याखाली आर्थिक मदत मिळण्यास पात्र ठरतात.

सदरहू कायद्याच्या कलम २५ अन्वयें कॉर्पोरेशनला पुढील व्यवहार करण्याचे अधिकार मिळाले आहेत:—

( अ ) औद्योगिक कंपन्यांना कर्जे देणें अथवा त्यांचीं डिबेंचर्स घेणें; ( ब ) औद्योगिक कंपन्यांनीं खुल्या बाजारांत उभारलेल्या कर्जाबाबत हमी देणें आणि ( क ) औद्योगिक कंपन्यांचे स्टॉक, शेअर, बॉण्ड अथवा डिबेंचर्स विकत घेण्याची हमी देणें.

### मदतीच्या मर्यादा

डायरेक्टर बोर्डानें औद्योगिक कंपन्यांना सुरुवातीस कर्जरूपानें अथवा त्यांचीं डिबेंचर्स घेऊन आर्थिक मदत करण्याचें ठरविलें आहे. हातीं असणाऱ्या पैशाचा विनियोग जास्तींत जास्त उद्योगधंद्यांना चांगल्या रीतीनें व्हावा म्हणून सर्वसाधारणपणें कोणत्याहि एका उद्योगधंद्याला जास्तींत जास्त ५ लाख रुपयांपर्यंत मदत करावी असें ठरविण्यांत आलें आहे. बोर्डाकडून प्रत्येक अर्जाचा गुणपरत्वें विचार करण्यांत येईल. मदतीची किमान रक्कम १०,००० रुपये राहील. कोणत्या उद्योगधंद्यांना आधीं मदत द्यावयाची याबाबत बोर्डानें अजून अग्रक्रम ठरविलेला नाहीं. परंतु नियोजनमंडळानें औद्योगिक विकासाचा जो कार्यक्रम ठरविला आहे त्यानुसार व मुंबई सरकारच्या औद्योगिक धोरणानुसार उद्योगधंद्यांना उत्तेजन देणें हें बोर्डाचें सर्वसाधारण धोरण राहील.

### कर्जाबाबतच्या अटी

बोर्डाच्या सध्यांच्या धोरणानुसार कर्जाबाबतच्या अटी व त्यासंबंधीचें धोरण थोडक्यांत पुढीलप्रमाणें राहील:—

( १ ) व्याजाचा दर दरसाल दर शेंकडा ६ रुपये असेल.

( २ ) कर्ज स्थूलमानानें मालमत्तेच्या म्हणजे जमीन, इमारती, यंत्रसामुग्री, वगैरेंच्या किंमतीच्या निम्म्या रकमेइतकें देण्यांत येईल व त्यासाठी तारण म्हणून जी मालमत्ता संबंधित उद्योगधंद्यांकडून घेण्यांत येईल त्याबरोबरच वरील मालमत्तेचेंहि पहिलें गहाणखत लिहून द्यावें लागेल.

( ३ ) कर्ज किती मुदतीसाठी द्यावयाचें तें प्रत्येक अर्जदार कंपनीचा गुणपरत्वें विचार करून ठरविण्यांत येईल; परंतु ते १० ते १२ वर्षांपेक्षा अधिक मुदतीचें असणार नाहीं. मुख्य कर्जाची परतफेड हप्त्याहप्त्यांनीं करावी लागेल व हे हप्ते प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीचा विचार करून ठरविण्यांत येतील.

( ४ ) अर्जाचा विचार करतांना पुढील गोष्टी लक्षांत घेण्यांत येतील:—अर्जदार कंपनीची आर्थिक परिस्थिति, तिनें देऊं केलेलें तारण पुरेसें आहे किंवा कसें, नफा मिळविण्याची आणि मुख्य कर्ज व व्याज हप्तेनंहप्तें परत करण्याची कुवत, कंपनीजवळ असणाऱ्या तंत्रज्ञांचा आणि व्यवस्थापकांचा अनुभव व कार्यक्षमता, विकासाच्या किंवा वाढीच्या योजना तांत्रिकदृष्ट्या मजबूत आहेत किंवा कसें आणि कंपनीची मालकी व पत.

### अर्जाबाबतची कार्यपद्धति

सार्वजनिक व खाजगी लिमिटेड कंपन्या आणि रजिस्टर्ड सहकारी संस्था, त्याचप्रमाणें रजिस्टर्ड कंपन्या, अविभक्त हिंदू कुटुंबें आणि व्यक्तिगत मालकीच्या कंपन्या यांच्याकरितां अर्जाचे जे फॉर्म ठरविण्यांत आले आहेत ते तयार असून ते युनायटेड इंडिया बिल्डिंग, पहिला मजला, फेरोजशहा मेहता रोड, फोर्ट, मुंबई येथें कॉर्पोरेशनच्या कचेरींत मिळूं शकतील.

कर्ज देण्याच्या बाबतींत मध्यम आणि छोट्या सार्वजनिक लिमिटेड कंपन्यांसह मुंबई राज्यांतील सर्व प्रकारच्या औद्योगिक कंपन्यांच्या अर्जाचा विचार बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडून करण्यांत येईल. अर्जाची तपासणी व विल्हेवाट शक्य तितक्या जलद लावण्याच्या दृष्टीनें आवश्यक ती कारभारविषयक यंत्रणा उभारण्यांत येत आहे.

तेव्हां, ज्या औद्योगिक कंपन्या कॉर्पोरेशनकडून आर्थिक मदत मिळण्यास पात्र असतील व ज्यांना अशी मदत हवी असेल त्यांनीं कॉर्पोरेशनच्या मॅनेजिंग डायरेक्टरांकडे जातीनें वा लेखी चौकशी करावी असा त्यांस सल्ला देण्यांत येत आहे. याबाबत कंपन्यांच्या चालकांना अधिक माहिती हवी असल्यास ती कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांकडून तत्परतेनें दिली जाईल.

---

## अमेरिकेकडे २५ तरुण शेतकरी रवाना

२० ते २८ वर्षें वयाचे २५ हिंदी तरुण शेतकरी अमेरिकेकडे नुकतेच रवाना झाले. ते अमेरिकन शेतकऱ्यांच्या घरीं राहून व शेतावर कामें करून तेथील शेतीचा प्रत्यक्ष अनुभव घेणार आहेत. इंटरनॅशनल फार्म यूथ एक्सचेंज ( IFYE ) नें ही योजना केलेली आहे. अमेरिकन शेतकरी जेवणाचा व रहाण्याचा खर्च सोसणार आहेत व प्रवासखर्च फोर्ड फौंडेशन देणार आहे. २५ जागांसाठी १,२५० हिंदी तरुण शेतकऱ्यांनीं अर्ज केले होते. निवडलेल्या उमेद्वारांत ऊंस बागायतदार श्री. उदयसिंगराव नानासाहेब गायकवाड ह्यांचा समावेश होता. ते कोंबड्या पाळण्याचें तंत्र अमेरिकेंत शिकणार आहेत.

ह्या २५ उमेद्वारांना दिल्ली येथें एक आठवडाभर "चांगला पाहुणा म्हणून कसें वागावें" ह्याचें ज्ञान करून देण्यांत आलें. वॉशिंग्टन येथें पोंचल्यावर आणखी एक आठवडा अशाच प्रकारची माहिती त्यांना देण्यांत येईल.

## सहकाराचीं ५० वर्षें

( " फिफ्टी इअर्स ऑफ कोऑपरेशन " मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटचें सुवर्ण महोत्सवी प्रकाशन, पृ. सं. ३०० किं. १० रु. )

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें सहकारी चळवळीचा सुवर्णमहोत्सव नुकताच साजरा केला. ह्या महोत्सवाचा एक भाग म्हणून इन्स्टिट्यूटनें " सहकाराचीं ५० वर्षें " हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. सहकाराच्या विविध अंगांच्या प्रगतीचा त्यांत स्थापनेपासूनचा इतिहास देण्यांत आला असून त्याबाबत प्रश्नांची अभ्यासपूर्वक चर्चा व चिकित्सा करण्यांत आली आहे. वेगवेगळ्या प्रकरणांत त्याची विभागणी केलेली आहे. सहकारी चळवळीशीं संबंधित अशा व्यासंगी व अभ्यासू तज्ज्ञांनीं केलेलें हें कथन माहितीपूर्ण, तसेंच मार्गदर्शक असें झालें आहे. डॉ. के. एन. नाईक, प्रो. के. आर. कुलकर्णी, श्री. जी. एम. लाड, श्री. व्ही. एम. ठाकोर, श्री. एन. पी. भागवत व श्री. आर. एम. तळपदे ह्यांनीं आपआपल्या अभ्यासाच्या व अनुभवाच्या विषयावर ( उ. इतिहास, शेतकी पत व मालाविक्री, शेतीसंस्था व सहकारी शेतकी, शेतकी-सहकाराचे प्रश्न, शहरी सहकार, सहकारी संस्थांच्या केंद्रीय संघटना, तपासणी, देखरेख व ऑडिट, शिक्षण, ट्रेनिंग व प्रचार, इ. ) रेखीव पद्धतीनें लेख लिहिलेले आहेत. शेवटचें प्रकरण प्रो. डी. जी. कर्वे ह्यांनीं लिहिलेलें असून प्रस्तावना लेखक श्री. वैकुंठलाल मेहता, इन्स्टिट्यूटचे व्हाइस चेअरमन, ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें " सहकारी चळवळीच्या उज्ज्वल भवितव्याचें जें चित्र दिसत आहे, त्याला मागील अनुभवांची बैठक देण्याचा प्रयत्न प्रो. कर्वे—राष्ट्रीय प्रश्नांच्या अभ्यासकांतील विशेष विचारवंतांपैकी एक—ह्यांनीं केला आहे. त्यांनीं केलेलें समालोचन आपणांस उत्साहवर्धक वाटेल; कारण त्यांच्या कल्पनेप्रमाणें, आपण योग्य योजना केली आणि सुसूत्रपणें प्रयत्न केला तर सहकारी चळवळीनें आर्थिक क्षेत्रांत गेल्या ५० वर्षांत जी कामगिरी बजावली तिचेपेक्षा अधिक उज्ज्वल कामगिरी बजावण्याची संधि तिला प्राप्त होईल."

प्रस्तुत पुस्तकाचे अखेर, एका परिशिष्टांत, मुंबई राज्यांतील ४३ प्रमुख दिवंगत सहकारी कार्यकर्त्यांची थोडक्यांत माहिती देऊन त्यांचे चळवळीवरील उपकार स्मरण्यांत औचित्य दाखविलें आहे. शेवटच्या परिशिष्टांत निवडक सहकारी पुस्तकांची यादी दिली आहे. अशा रीतीनें प्रस्तुत पुस्तक हें सहकारी संस्थांना व कार्यकर्त्यांना अद्यावत माहितीचें गाईड झालेलें आहे.

सहकारी सुवर्ण महोत्सवाच्या निमित्तानें श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचे, सहकारी चळवळीच्या प्रगतीच्या इष्टानिष्ट दिशेबद्दल मार्गदर्शक विचार कोठेच वाचावयास मिळालेलें नाहींत, हें मात्र येथें व्यक्त केल्याखेरीज रहावत नाहीं. श्री. मेहता ह्यांचेइतका सहकारावर अधिकारीवाणीनें बोलूं शकणारा तज्ज्ञ, अभ्यासू, निष्ठावंत, अनुभवी व प्रत्यक्ष कार्य करून दाखविलेला समाजसेवक भारतांत दुसरा सांपडणार नाहीं. त्यांच्या, व्हाईस चेअरमन ह्या नात्याच्या मामुली प्रस्तावनेनें वाचकांचें समाधान होत नाहीं. त्यांच्या विचारांची भर पडली असती तर पुस्तकाच्या मूल्यांत अधिकच वाढ झाली असती.

---

मुंबई बंदरांत आलेल्या बोटी—१९५३ सालीं मुंबई बंदरांत रोज सरासरी आठ बोटींनीं आसरा घेतला. सर्व वर्षांत मिळून २,८१९ बोटींनी मुंबई बंदरांत नांगर टाकले, असें समजतें.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**


सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल व रिझर्व | रु. | ११,७०,३०० |
| ठेवी .... .... .... | रु. | १,१९,११,७०० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,३३,९४,५०० |

शाखा:- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात शाखा:-

दादर बेळगांव

माहीम पुणें



स्थापना १९१८


---

## दि बँक ऑफ औंध लि., सातारा शहर

वरील बँकेस अहवालाचे वर्षी ३,८७० रु. नफा झाला. सरकारी रोख्यांच्या विक्रींतील तोटा ( २,२६५ रु. ) खर्ची टाकून व ५०० रु. बोनस देऊन हा नफा उरला आहे. गेल्या वर्षी बँकेकडील ठेवी ५०,००० रुपयांनीं वाढल्या. बँकेची स्मॉल सेव्हिंग्ज योजना लोकप्रिय होत आहे. गुणदाळ विभागांतील सहकारी सोसायट्यांना दिलेलीं कर्जें विजापूर सें. को. बँकेकडे वर्ग होण्याबाबत योजना पुरी झाली असून, त्यांत अडकलेली रक्कम लवकरच मोकळी होऊन हातीं येईल अशी अपेक्षा आहे. बँकेची मजबुती वाढविण्याच्या दृष्टीनें नफा न वाटतां रिझर्व्ह व इतर फंडांत भर टाकण्याचें डायरेक्टरांचें धोरण योग्यच आहे.

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,६९,००० | कॅश, बँकांत | २,८१,६५२ |
| रिझर्व्ह, इतर फंड | ६०,०२३ | इन्व्हेस्टमेंटस | ४,३५,९९८ |
| ठेवी | १०,१५,६०८ | कर्जें | ५,३१,४८४ |
| एकूण | १२,९३,२३४ | एकूण | १२,९३,२३४ |

---

## प्राथमिक शिक्षकांसाठी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

इन्स्टिट्यूटच्या आदेशानुसार खास मराठी शाळामास्तर्स व इतर उमेदवारांसाठी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, नाशिक येथें, ता. १२-५-१९५४ ते ता. १५-६-१९५४ अखेर एक महिना मुदतीचा भरवावयाचा आहे. ज्या उमेदवारांना ट्रेनिंग क्लास घ्यावयाचा असेल त्यांनीं ऑनररी सेक्रेटरी, नाशिक डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्ड लि. नाशिक ( सह्याद्रि इन्शुरन्स कंपनीच्या कंपौंडांत ) आग्रारोड नाशिक यांचेकडे ता. ११-५-१९५४ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. ३ पाठवावी. क्लास फी शिवाय अर्ज स्वीकारले जाणार नाहींत. उमेदवारांना सदर शिक्षण स्वखर्चानें घ्यावे लागेल. क्लास फी भरल्यावर कोणत्याहि सबबीवर परत केली जाणार नाहीं. क्लासच्या मुदतींत परीक्षा फी रु. ३ भरावी लागेल. ह्या क्लासासाठी कोणाहि शिक्षकांस व उमेदवारास क्लासचा फायदा घेतां येईल. एस. एस. सी. परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांनाहि क्लासचें शिक्षण घेतां येईल. तरी उमेदवारांनीं पंचवटी नागरिक को. स्टोअरच्या ऑफिसांत पंचवटी ( नाशिक ) येथें समक्ष जातीनें ता. १२-५-५४ रोजीं दुपारीं ११ वाजतां बिनचूक हजर व्हावें.

| | |
|---|---|
| एन्. वाय. कुलकर्णी | दगाजी अजबा पाटील. |
| को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर आणि | चेअरमन |
| ऑन. सेक्रेटरी डि. को. बोर्ड | नाशिक डि. को. बोर्ड लि. |
| नाशिक. | नाशिक. |

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

### श्री. म. रा. साठे, चेअरमन, ह्यांचें वार्षिक सभेंतील भाषण

" उद्योगधंद्यांना विशेषतः खाजगी प्रयत्नांना ज्यास्त भांडवल-पुरवठा कसा उपलब्ध करून देतां येईल, ह्यासंबंधीं सूचना करण्यासाठीं श्रॉफ कमिटी नेमण्यांत आली, ही बँकिंगच्या दृष्टीनें महत्त्वाची घटना झाली. देशाला अधिक पैशाची गरज असतांना चलनाचा एकाएकीं संकोच करण्यांत आला, त्याच्या परिणामांची जाणीव सरकारला झाली असल्याचें तें चिन्ह आहे. खासगी उद्योगांना जरूर असलेला पैसा सरकारनें जादा कर किंवा जास्त दरानें कर्जें उभारून जमा केल्यामुळें, ह्या उद्योगांची थोडी कुचंबणा झाली आणि पंचवार्षिक योजनेनें प्रारंभीं तरी औद्योगिक घडामोडींस थोडी आडकाठीच केली. श्रॉफ कमिटी उद्योगधंद्यांना पोषक अशा शिफारसी करून बेकारी कमी करण्यास मदत करील अशी आशा आहे.

" वेगवेगळया राज्यांत स्टेट इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन्स काढण्यांत येत आहेत, ही फार संतोषाची गोष्ट आहे. त्यांच्या शेअर भांडवल विक्रीस चांगला पाठिंबा मिळाला, ह्यावरून जनतेची लहान व मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांबद्दलची कळकळ दिसून येते. त्यांतन किती रोजगार निर्माण होतो, हें कॉर्पोरेशन्सच्या काटकसरीच्या कारभारावर व प्रारंभींच्या काळांत नुकसान सोसण्याच्या तयारीवर अवलंबून राहील. कर चौकशी कमिटीची नेमणूक करून सरकारनें योग्य पाऊल टाकलें आहे. सरकारची पैशाची भूक भागविणें व उत्पादन वाढीस प्रोत्साहन मिळून बेकारी कमी होईल ह्या दृष्टीनें भांडवल वाढीस उत्तेजन देणें, अशीं दोन कामें एकदमच कमिटीला करावयाचीं आहेत.

" अर्थमंत्र्यांनीं बजेटावरील भाषणांत रंगविलेलें चित्र, ही परिस्थितीची एक बाजू झाली. कांहीं हातांवर मोजण्याइतक्या उद्योगांचें उत्पादन वाढलें असलें तरी मध्यम व लहान आकाराच्या उद्योगांवर आपत्ती कोसळली असल्यामुळें आणि त्यांच्यांतच व्यापक क्षेत्रांत रोजगारी मिळत असल्यामुळें, एकूण परिस्थिति जरा अवघडच आहे. सरकारच्या वेगवेगळया खात्यांच्या धोरणांत एकसूत्रीपणा आढळत नाहीं आणि त्यामुळें घोटाळे निर्माण होतात. एका धंद्याला एक धोरण, तर दुसऱ्या धंद्याला दुसरें, विसंगत धोरण, असें आढळतें. सुसूत्रीपणास अग्र-प्राधान्य दिलें पाहिजे.

" सुमारें आठ वर्षांच्या खंडानंतर, भारी किंमतीच्या नोटा पुनः सुरू करण्यांत येत आहेत. त्यामुळें बँकांच्या व्यवस्था खर्चांत निश्चित बचत होईल व व्यापारी वर्गाचीहि सोय होईल. त्याबरोबरच, समाजहितविरोधी लोक त्या नोटांचा उपयोग लपून व्यवहार करण्याकडे करतील; हा अपायकारक परिणामहि विसरून चालणार नाहीं. ह्या सोइस्कर नोटा भारताबाहेर लपून पाठविल्या जाणेंहि शक्य आहे व त्याचें बदला दुर्मिळ व बंदी केलेल्या जिनसांची चोरटी आयात केली जाऊन, आणि त्यांची कमी किंमत लावून कस्टम्स ड्यूटी बुडविली जाईल अशीहि शक्यता आहे. परदेशांत ह्या नोटा भारताचें अधिकृत चलन म्हणून स्वीकारल्या जाणार नाहींत, अशी व्यवस्था भारत सरकारनें केली पाहिजे, असें मला सुचवावेंसें वाटतें. अशी दक्षता घेतली नाहीं तर स्वस्त, मुबलक आयातीचा हिंदी उद्योगधंद्यांवर दुष्परिणाम होण्याचा संभव आहे.

" डायरेक्टर बोर्डानें ४% (वजा कर) डिव्हिडंड सुचविलें आहे, त्यास आपण मान्यता द्यालच. बँकेनें तिच्या १७ वर्षांपैकीं १५ वर्षे डिव्हिडंड वाटलें आहे व त्याची बेरीज ५०½% होते. बँकेचें खेळतें भांडवल वाढत आहे व त्यानें १९५१ ची पातळी पुनः गाठली आहे. तें आणखीहि वाढेल अशी आशा आहे.

" माझे सहकारी, विशेषतः मॅनेजिंग डायरेक्टर श्री. चितळे, कुशल मॅनेजर श्री. जोगळेकर व त्यांचे हाताखालील नोकरवर्ग ह्यांच्या उत्कृष्ट कामाबद्दल मी त्यांचे आभार मानतों."

## तरुणांचें योग्य मार्गदर्शन

### " किर्लोस्कर " ची शिक्षण व व्यवसाय-मार्गदर्शक पुरवणी

विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणक्रमाची व व्यवसायाची निवड करण्यास उपयुक्त ठरेल असें साहित्य "किर्लोस्कर" मासिकाच्या मे महिन्याच्या अंकांतील ४८ पृष्ठांच्या विस्तृत पुरवणींत दण्यांत आलें आहे. शाळेंतील अभ्यास संपवून एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांना ते कोणत्या आयुष्यक्रमाची पूर्व तयारी करीत आहेत ह्याची कल्पनाहि नसते आणि पालकहि " पुढें पाहूं " असें म्हणून राहतात. त्यामुळें, नोकरी किंवा व्यवसाय ह्यांस आवश्यक असें पुस्तकी शिक्षण ते मिळवूं शकले, तरी त्यांची मनोवृत्ति त्याला अनुकूल असतेच असें नाहीं आणि वर्गाबाहेरील प्रत्यक्ष अनुभवाचा फायदा त्यांना मिळूं शकत नाहीं. इंजिनिअरिंगचा कोर्स घेऊं इच्छिणाऱ्यानें आधींच दोन-तीन वर्षे त्या अभ्यासास उपकारक अशा गोष्टी ( चालू कामें, गोद्या, बंदरें, धरणें, वीजगृहें, इ. ) पाहून ठेवल्या तर त्याला त्याचा विषय अधिक चांगला कळूं शकेल. इंजिनिअरिंगचेंच उदाहरण पुनः घेतलें, तर किती तरी विद्यार्थी पहिल्याच वर्षी नव्या, अपरिचित विषयांस निष्कारण बळी पडतात, असें आढळून येईल. डॉक्टरी अभ्यासक्रमास पुरेसें मनोधैर्य व निश्चय कित्येकांत आढळत नाहीं पण त्याचा शोध फार उशिरा लागतो. त्यामुळें, व्यवसाय एक पण खरी आवड वेगळी, अशी परिस्थिति निर्माण होऊन शिक्षणाचें चीज होत नाहीं व सुखाहि लागत नाहीं. देशहि कार्यप्रवीण लोकांस मुकतो. किर्लोस्कर पुरवणीनें ही अडचण लक्षांत घेऊन उत्कृष्ट मार्गदर्शन केलें आहे व त्यांत नामवंत तज्ज्ञांचं सहकार्य मिळविलें आहे. विद्यार्थ्यांप्रमाणें पालकांनाहि पुरवणीचें वाचन उपयुक्त वाटेल, अशी आम्हांस खात्री आहे.

---

### दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

वरील बँकेची जाहिरात आमच्या सहकार विशेषांकांत पृष्ठ १३४ वर प्रसिद्ध झाली आहे. त्यांत प्रेसिडेंट ह्यांचें नांव चुकीनें अ. धों. कुळकर्णी असें छापलें गेलें आहे. वास्तविक तें अ. कों कुळकर्णी असें पाहिजे.


# कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "

| गुजराती भाषांतर | मराठी आवृत्ति |
| --- | --- |
| प्रो. शशिन ओझा, भावनगर. | सहा महिन्यांत संपली |
| प्रस्तावना : मा. दादासाहेब मावळंकर | दुसरी आवृत्ति मे, १९५४ अखेर प्रसिद्ध होईल. |

## दि डेक्कन बँक्स असोसिएशनचे नवे पदाधिकारी

**श्री. के. पां जोशी, नवे अध्यक्ष**

दि डेक्कन बँक्स असोसिएशन, पुणें, या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन, १९५४ सालाकरतां खालीलप्रमाणें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें आहे:—

१ अध्यक्ष—श्री. के. पां. जोशी, वकील, चेअरमन, भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें.

२ उपाध्यक्ष—श्री. बी. बी. चौधरी, वकील, डायरेक्टर, रत्नाकर बँक लि. कोल्हापूर.

३ ऑनररी सेक्रेटरी व ट्रेझरर—श्री. म. त्र्यं. शिंगरे, चेअरमन, मोर स्टेट बँक लि. पुणें.

इतर सभासद् बँका:—४ बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें. ५ प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें. ६ बँक ऑफ पूना लि. पुणें. ७ बुधगांव बँक लि. बुधगांव. ८ बँक ऑफ कराड लि. कराड (स्वीकृत)

---

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स क्वार्टर्ली

**सहकार विशेषांक.**

डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणें, ह्या संस्थेच्या त्रैमासिकाचा तिसऱ्या वर्षाचा पहिला अंक "सहकार विशेषांक" म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. आर्थिक संस्था कार्यक्षमतेनें चालविण्याला तत्पर, हुशार, कामसू व निष्णात असा नोकर व अधिकारीवर्ग लागतो. त्याचें शिक्षण डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स ही संस्था आत्मीयतेनें देत आहे. सहकारी चळवळीच्या प्रसाराला अशा अधिकारीवर्गाचा व नोकरवर्गाचा अभाव ही एक मोठीच अडचण भासते. जनतेला सुजाण करण्याचें महत्त्वाचें कार्य इन्स्टिट्यूट करीत आहे. साहजिकच, सहकारी चळवळीबद्दल संस्थेच्या चालकांना विशेष आस्था वाटते व म्हणून तिनें सहकारी सुवर्णमहोत्सवाच्या निमित्तानें प्रस्तुत विशेषांक काढला आहे. अनेक वृत्तपत्रांनीं असे विशेषांक काढले किंवा पुरवण्या काढल्या त्यांपैकीं कित्येकांपेक्षा प्रस्तुत विशेषांक सरस आहे, हें नमूद करण्यास आनंद वाटतो. रावसाहेब खोले, श्री. दा. वा. पोतदार व प्रा. कृ. रा. कुलकर्णी ह्यांच्या योजनापूर्वक घेतलेल्या मुलाखती हें ह्या अंकाचें वैशिष्ट्य आहे. संस्थेच्या चालकांची वृत्ति व कार्यक्षमता ह्यांचें सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांनीं अनुकरण केलें तर प्रगति शीघ्रगतीनें व योग्य मार्गानें होईल.

---

## लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँन्ड पोलिटिकल सायन्सेसची भारतांतील प्रवेशपरीक्षा बंद

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँन्ड पोलिटिकल सायन्सेसच्या पहिल्या पदवी परीक्षेच्या अभ्यासक्रमासाठी भारतांत यापुढें प्रवेश परीक्षा न घेण्याचें सदरहू स्कूलनें ठरविलें असून ज्यांना प्रवेश हवा असेल त्यांच्याकडून प्रतिवर्षी ठराविक मुदतींत अर्ज मागविण्यांत येतील. भारतीय विद्यापीठांची किमान बी. एससी ऑनर्स आणि बी. कॉम्. परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास झालेल्या लोकांनाच अर्ज करतां येईल. अंडरग्रॅज्युएट उमेदवार त्यासाठी पात्र समजले जाणार नाहींत.


# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्ष मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

दि
# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

## राष्ट्रीय नियोजन कर्जरोखे घेण्यासाठीं सवलत

★

आपले पंतप्रधान श्री. नेहरू यांनीं राष्ट्रीय नियोजन कर्जरोखे घेण्यास जनतेला आवाहन केलें आहे. हे साडेतीन टक्के दराचे रोखे घेऊन बँकेच्या खातेदारांना या राष्ट्रकार्यांत भागीदार होतां यावें म्हणून बँकेनें खास सवलतीची व सोयीस्कर योजना केली असून तिचा त्यांनीं अवश्य फायदा घ्यावा.

★

अधिक माहिती बँकेच्या मुख्य कचेरींत वा शाखांत मिळूं शकेल.

चिं. वि. जोग,
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीनिवास वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८११ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें